आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१२ सप्टेंबर २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- देशाच्या हवाई वाहतूक क्षेत्रात लक्षणीय परिवर्तन होत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- मुंबईला जागतिक आर्थिक केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी एमएमआरडीए आणि वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम यांच्यात सामंजस्य करार

- मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स १ हजार ४३९ अंकांची वाढ नोंदवत विक्रमी उंचीवर, राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीनंही गाठली नवी पातळी

- आशियाई पुरूष हॉकी स्पर्धेत दक्षिण कोरियाला ३-१ नं नमवत भारतानं साकारला सलग चौथा विजय

**आणि**

- मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस सीताराम येचुरी यांचं निधन

**<><><><><>**

देशाच्या हवाई वाहतूक क्षेत्रात लक्षणीय परिवर्तन होत असून त्यामुळे नागरिकांचा प्रवास अधिक सुखकर होत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे ते आज नवी दिल्लीत नागरी विमान वाहतूक या विषयावर दुसऱ्या आशिया- प्रशांत मंत्रिपरिषदेत मार्गदर्शन करताना बोलत होते. या परिषदेत दिल्ली ठराव जाहीर करण्यात आला. त्याचा सर्व सदस्य देशांनी

स्वीकार केला. नागरी विमान वाहतूक मंत्री राममोहन नायडू यांनी या परिषदेचं उद्घाटन केलं. ते या परिषदेचे अध्यक्ष आहेत. २०३५ पर्यंत साडेतीन अब्ज वार्षिक प्रवाशांसाठी आशिया- पॅसिफिक क्षेत्रात विमान वाहतूकसाठी पायाभूत सुविधांमधे गुंतवणूकीचं आवाहन त्यांनी केलं. २०२५ पर्यंत या क्षेत्रातल्या एकूण कर्मचाऱ्यांपैकी २५ टक्के कर्मचारी महिला असतील असं भारताचं उद्दिष्ट असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

एमएमआरडीए अर्थात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम यांच्यात आज सामंजस्य करार झाला. ‘मुंबई महानगर क्षेत्रः जागतिक आर्थिक केंद्र म्हणून विकास’ या निती आयोगाच्या अहवालाचं मुंबईत प्रकाशन झालं. त्यावेळी हा करार झाला. मुंबईतल्या सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या या कार्यक्रमाला वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचे संस्थापक आणि कार्यकारी अध्यक्ष क्लॉस श्वाब प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. उद्योग मंत्री उदय सामंत, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, सार्वजनिक मंत्री रविंद्र चव्हाण, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरतेच्या दिशेनं भारताची वाटचाल वेगानं होत असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी म्हटलं आहे. भारतीय हवाई दलातर्फे राजस्थानात जोधपूर इथं आयोजित तरंग शक्ती विमान सरावाची

पाहणी केल्यानंतर आज ते बोलत होते. या सरावाच्या निमित्तानं हवाई दलानं आयोजित केलेल्या भारतीय संरक्षण हवाई प्रदर्शन म्हणजे आयडॅक्स-२४ चं उद्घाटन राजनाथसिंह यांच्या हस्ते झालं. आजपासून चौदा तारखेपर्यंत चालणाऱ्या या प्रदर्शनात विमानविषयक सामुग्री उत्पादन क्षेत्रातल्या कंपन्यांचा मोठा सहभाग आहे.

<><><><><>

ओडिशात बालापूर जिल्ह्यातल्या चंडीपूर एकात्मिक चाचणी तळावरून आज भारतानं व्हीएल एसआरसॅम या जमिनीवरून जमिनीवर मारा करणाऱ्या लघु पल्ल्याच्या क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी घेतली. डीआरडीओ अर्थात संरक्षण संशोधन आणि विकास संस्था आणि भारतीय नौदलानं ही चाचणी घेतली. हे क्षेपणास्त्र परिमाणांच्या सर्व कसोट्यांवर उतरलं. ही जहाजस्थित क्षेपणास्त्र प्रणाली असून त्यामुळे विविध प्रकारच्या हवाई धोक्यांचा सामना करता येतो.

<><><><><>

हाय अल्टिट्युड अँटी सबमरिन वॉरफेअर हे पाणबुडीरोधक युद्ध तंत्रज्ञान अमेरिका भारताला विकणार आहे. ५ कोटी २८ लाख रूपये किमतीचं हे तंत्रज्ञान असून त्यामुळे भारताला एमएच ६० आर या हेलिकॉप्टरमधून पाणबुड्यांवर मारा करता येईल. या प्रस्तावित व्यवहारामुळे भारत आणि अमेरिकेतल्या द्वीपक्षीय संबंधांना नवे आयाम मिळणार असल्याचं अमेरिकेच्या संरक्षण विभागानं म्हटलं आहे.

<><><><><>

श्रोते हो, ऑस्ट्रेलियातल्या मेलबर्नमध्ये गेल्या ४-५ दशकांपासून गणेशोत्सव साजरा केला जातो. या विषयीची माहिती आकाशवाणीच्या श्रोत्यांना देताना अनुपमा कट्यारे यांनी सांगितलं…

**होल्ड - मेलबर्न अनुपमा कट्यारे**

<><><><><>

जागतिक बाजारातल्या सकारात्मक वातावरणाचे पडसाद आज देशातल्या शेअर बाजारांमधे उमटले आणि बाजार नव्या उच्चांकावर बंद झाले. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्सनं एक हजार ४३९ अंकांची झेप घेतली  आणि तो दिवसअखेर ८२  हजार  ९६२ या विक्रमी पातळीवर  बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ४७०  अंकाची वाढ  नोंदवत २५  हजार ३८८ या उच्चांकावर बंद झाला. धातू, दूरसंचार आणि तंत्रज्ञान क्षेत्रातल्या कंपन्यांचे समभाग तेजीत राहिले.

<><><><><>

चीनच्या हुलनबुइर इथं सुरू असलेल्या आशियाई पुरूष हॉकी स्पर्धेत आज भारतानं दक्षिण कोरियाला नमवत सलग चौथा विजय नोंदवला. भारतानं दक्षिण कोरियाचा ३-१ अशा गोलफरकानं पराभव केला. अराईजीत सिंग हुंदाल आणि कर्णधार  हरमनप्रीत सिंग यांनी भारतासाठी गोल केले.

काल मलेशियाचा ८-१ असा दणदणीत पराभव करत, याआधीच भारत उपांत्य फेरीत दाखल झाला आहे. भारतीय संघ सध्या गुणतालिकेत

अव्वल स्थानी आहे. गुणतालिकेतले पहिले चार संघ १६ सप्टेंबरला उपांत्य सामने खेळतील, तर अंतिम सामना १७ तारखेला होईल. भारतानं या स्पर्धेचं जेतेपद चारवेळा मिळवलं आहे.

**<><><><><>**

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस सीताराम येचुरी यांचं आज नवी दिल्लीत दीर्घ आजारानं निधन झालं. ते ७२ वर्षांचे होते. श्वासनलिकेत संसर्ग झाल्यामुळे मागच्या काही दिवसांपासून त्यांच्यावर एम्समध्ये उपचार सुरू होते. मागच्या पाच दिवसांपासून त्यांना जीवरक्षण प्रणालीवर ठेवण्यात आलं होतं. आज दुपारी तीन वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

येचुरी यांचं पार्थिव मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या दिल्लीतल्या मुख्यालयात शनिवारी सकाळी अकरा ते दुपारी तीन वाजेपर्यंत अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर येचुरी यांचा देह रुग्णालयाला दान केला जाणार आहे.

*(सीताराम येचुरी हे गेल्या पाच दशकांपासून राजकारणात सक्रीय होते. दिल्लीतल्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठात उच्चशिक्षण घेत असताना ते स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया या माकप प्रणित विद्यार्थी संघटनेशी जोडले गेले.त्यानंतर त्यांनी जेएनयू विद्यार्थी संसदेच्या अध्यक्षपदी निवडून आले होते. आणीबाणीला विरोध केल्यामुळे येचुरी यांना तुरुंगवासही भोगावा लागला होता. त्यानंतर ते मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षात सामील झाले. सलग बारा वर्षे त्यांनी राज्यसभेत पक्षाचं प्रतिनिधित्व केलं. २०१५ पासून ते मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे महासचिव म्हणून कार्यरत होते. डाव्या पक्षांमध्ये समन्वय साधणारे तसंच इतर पक्षांमधल्या नेत्यांशी संवाद असणारे नेते म्हणून येचुरी यांची ओळख होती. सर्वपक्षीय नेत्यांना येचुरी यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.)*

**<><><><><>**

**राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू** यांनी येचुरी यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. विद्यार्थी राजकारण, राष्ट्रीय राजकारण आणि संसदेत येचुरी हे एक प्रभावी आवाज म्हणून कार्यरत होते. आपल्या विचारसरणीशी बांधिलकी असूनही त्यांचे सर्व पक्षांमध्ये मित्र होते, असं राष्ट्रपतींनी म्हटलं आहे. तर, सीताराम येचुरी म्हणजे डाव्या चळवळीला वाट दाखवणारा दिवा होता, राजकीय परीघाच्या पलीकडे संवाद साधण्याची क्षमता त्यांच्याकडे होती, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

येचुरी यांच्या निधनानं राजकीय क्षेत्राची हानी झाली असल्याची भावना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी व्यक्त केली आहे. **येचुरी हे एक** अनुभवी नेते होते, विद्वत्ता आणि वक्तृत्वासाठी ते ओळखले जात असं संरक्षण मंत्री **राजनाथ सिंह** यांनी म्हटल आहे. तर येचुरी यांचं सार्वजनिक आयुष्यातलं योगदान कायम स्मरणात राहिल, असं केंद्रीय मंत्री **नितीन गडकरी** म्हणाले.

**सीताराम येचुरी** हे आयडीया ऑफ इंडियाचे संरक्षक होते, त्यांना देशाची सखोल समज होती, असं लोकसभेतले विरोधी पक्षनेते **राहुल गांधी** यांनी म्हटलं आहे.

येचुरी हे देशातल्या डाव्या पक्षांतील महत्वाचा आवाज होते, श्रमिक, कामगार आणि शेतकऱ्यांचा आवाज येचुरी यांच्या जाण्यानं हरपला आहे, अशी भावना ज्येष्ठ नेते **शरद पवार** यांनी व्यक्त केली आहे.

येचुरी यांची पक्षनिष्ठा आणि विचारांशी असणारी बांधिलकी ही राजकारणाच्या क्षेत्रात आदर्श बाब आहे, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. भाकपचे राष्ट्रीय सचिव भालचंद्र कांगो आणि भाकप नेते राजन क्षीरसागर यांनीही येचुरी यांच्या डाव्या चळवळीतल्या योगदानाचं स्मरण करत त्यांना आदरांजली वाहिली.

**<><><><><>**

पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत सहभागी झालेल्या भारतीय पथकासोबत आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी संवाद साधला. या प्रतिष्ठित स्पर्धेतल्या यशाबद्दल त्यांनी पदकविजेत्यांचं आणि सहभागी खेळाडूंचं अभिनंदन केलं. भारतानं ७ सुवर्ण, ९ रौप्य आणि १३ कांस्य अशी २९ पदकं मिळवून विक्रमी कामगिरी केली आहे. केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय तसंच भारतीय पॅरालिम्पिक समितीचे अध्यक्ष देवेंद्र झाझरिया हेही यावेळी उपस्थित होते.

**//<><><><><>//**